# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सन २०१५ मध्ये नोंदणी केलेल्या नोंदणीकृत पदवीधर मतदारांसाठी जाहीर विज्ञापन

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ९९(१) अन्वये ज्या पदवीधरांची नावे पदवीधरांच्या यादीत होती अशा पदवीधरांमधून महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २५(२)(आर) नुसार अधिसभेवर निवडून द्यावयाच्या १० जागांसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी दि.२६.०६.२०१५ ते ३०.०७.२०१५ या कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरून घेतलेले आहेत.

या विज्ञापनाव्दारे जाहीर करण्यात येते की, दि.१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंमलात आला असून त्यानुसार निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

यापूर्वी ज्या नोंदणीकृत पदवीधरांनी पदवीधर मतदार यादीसाठी नोंदणी केली आहे त्यांच्याकडून त्यांचा निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एक दस्तऐवज) मागविण्यात येत आहे. त्याकरिता मतदान केंद्र व विद्याशाखा निहाय यादी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तेव्हा सन २०१५ मध्ये उपरोक्त कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी केलेल्या नोंदणीकृत पदवीधरांनी www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर University Election 2017 या लिंकवर आपला बदललेला पत्ता, मोबाईल नंबर व ई-मेल आयडी नमुद करून आपला अर्ज अद्ययावत करावा व त्याची A-4 साईज कागदावर प्रिंट घेवून अर्ज उपरोक्त पैकी एक निवासाचा पुरावा साक्षांकित प्रतिसह सोबत जोडून दि.२४ जुलै, २०१७ पर्यंत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत विद्यापीठामध्ये सादर करावा.

कोल्हापूर<br>
दिनांक : ०४.०७.२०१७

डॉ.व्ही.डी.नांदवडेकर<br>
कुलसचिव